नियमीत दिवाणी मुकदमा नंबर २१/२००९.

निशाणी ५९ खालील आदेश

प्रस्तुत दाव्याचे कामी वादी यांनी पुर्वीच्या दुरुस्ती अर्जात नमूद केलेली परिच्छेद ४अ मध्ये राहिलेले दोष दुरुस्तीसाठी तसेच नवीन परिच्छेद ४ब मध्ये आणि त्या अनुषंगाने प्रतिवादी नं. ८ व ९ याचा समावेश दाव्यात करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. सदरहू अर्जावर निशाणी ६८ येथे प्रतिवादी नं. १ ने म्हणणे दाखल केले आहे. दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व दरम्यानचे कालावधीत उत्पन्नासाठी दाखल करण्यात आला आहे. वादीने निशाणी ४८ येथे तारीख २९.९.२०११ रोजी दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी अर्ज दिला होता, सदरचा अर्ज दिनांक १८.३.२०१३ रोजी मंजूर करण्यात आला आहे. त्या आदेशाप्रमाणे वादी यांनी दाव्यात कोणतीही दुरुस्ती केली नाही. त्यानंतर निशाणी ४८ नुसार अ.पा.क. म्हणुन नेमणुकीबाबत अर्ज दाखल केला होता. प्रस्तुतच्या अर्जाने वादी जी दुरुस्ती करुन मागत आहे, त्या दुरुस्तीचे एकंदर स्वरुप विचारात घेतले तर प्रतिवादी नं. ७ हिची कैफियत अभिलेखावर आल्यानंतर, दावा प्रलंबित असताना दिनांक ८.४.२०१५ रोजी बाळू महादू सकरे यांचे नावाने जे खरेदीखत झाले त्यानुसार त्याबाबतचा मजकूर दावा कथनात समावेश करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. दावा वाटपासाठी असल्याने आणि दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना ज्या काही घटना घडल्या आहेत त्या अनुषंगाने दाव्यात, अर्जाप्रमाणे दुरुस्ती करुन मागत आहेत. सदरचा दुरुस्ती अर्ज हा २७.४.२०१५ तारखेला दाखल करण्यात आला आहे. त्या घटनाबाबतची माहिती वादी यांना ज्या तारखेला झाली त्याचा विचार करता अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात आल्यास प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीत घेतलेल्या बचावाला बाधा येणारी नाही किंवा वादीच्या दाव्यातील कथनामुळे प्रतिवादी यांना ज्या काही मान्यता मिळालेल्या असतील त्या काढून [withdrawal] घेण्यात आल्या आहेत अशी परिस्थिती येणार नसल्याने अर्जात मागणी केल्याप्रमाणे अंतीम न्याय पुर्ततेसाठी दुरुस्तीस परवानगी देण्यात येते. सदरची दुरस्ती आदेश तारखेपासून १४ आत करुन दुरुस्त दाव्याच्या प्रत त्याच मुदतीत दाखल करणेची आहे.

sdxxx

दिनांक २० .३.२०१७. [स.द.कामत.]

दिवाणी न्यायाधीश क.स्तर जत.

नियमीत दिवाणी मुकदमा नंबर ५१/२००९.

निशाणी ८२ खालील अंतीम आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी मुदतीचा कायदा कलम १०८ प्रमाणे दावा मुदतीत नाही तसेच ***2015 All SCR 3567 , 2015 [2] All MR 38*** यानुसार दाखल करणे योग्य नसल्याने त्याबद्दल दावा दाखल करण्याचा अधिकार वादीस नसल्याने दावा काढून टाकण्यात यावा या मागणीसाठी सादर करण्यात आला आहे.

प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जात घेतलेली हरकत व त्याबाबत वादी यांनी अर्जावर दिलेले निशाणी ८५ येथे म्हणणे या अनुषंगाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जात नमूद केल्याप्रमाणेची मुदतीबाबतची दाव्यास असलेली बाधा आणि दावा दाखल करण्याबाबत हिंदू कायद्यातील सन २००५ चे दुरुस्तीनुसार दावा दाखल करण्याचा वादीना अधिकार आहे का या गोष्टी आदेश १४ रुल १ प्रमाणे मुद्दा काढून त्याप्रमाणे दोन्ही बाजूचा पुरावा नोंदविल्यानंतर निर्णीत कराव्या लागणाऱ्या आहेत , निव्व्ळ वादीचा दावा मुदतीत नाही व दावा दाखल करण्याचा अधिकार वादीला नाही अशा निष्कर्षाप्रत, कोणताही पुरावा नोंदविलेला नसताना, येता येणारे नाही सबब प्रतिवादी यांनी घेतलेल्या हरकतीबाबत दाव्याचे कामी मुद्दे काढताना विचार करण्यात येईल असा आदेश पारीत करुन अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतो.

दिनांक १६.२.२०१७

[स.द.कामत.]
दिवाणी न्यायाधीश क.स्तर जत.